**ठळक बातम्या**

- उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर
- संसदेत विविध मुद्द्यांवरून आजही गदारोळ, दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त राज्याची आदरांजली

**आणि**

- व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडरच्या दरात साडे तेहतीस रुपयांची कपात

**<><><><>**

नव्या उपराष्ट्रपतींची निवड करण्यासाठी भारत निवडणूक आयोगानं आज निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. येत्या ७ ऑगस्टला निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी होईल. २१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत राहील तर ९ सप्टेंबरला मतदान होणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झालं आहे. आयोगानं या निवडणुकीसाठी मतदार संघातल्या सदस्यांची यादी अद्ययावत केली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य उपराष्ट्रपती निवडतात.

**<><><><>**

विविध मुद्द्यांवर गदारोळ झाल्यानं संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं आहे. लोकसभेत ११ वाजता कामकाज सुरु झाल्यावर सभापती ओम बिरला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला, त्याचवेळी विरोधी पक्षांनी बिहारमधलं मतदारयाद्या पुनरिक्षण रद्द करावं या मागणीसाठी घोषणा द्यायला सुरुवात केली. गदारोळामुळे सभापतींनी कामकाज आधी दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब केलं, नंतरही गदारोळ चालूच राहिल्यानं दिवसभरासाठी स्थगित केलं.

राज्यसभेत विरोधकांनी विविध मुद्द्यांवर घोषणाबाजी केली. आपल्याकडे ३० स्थगन प्रस्ताव आले असून ते फेटाळत असल्याचं उपाध्यक्ष हरिवंश यांनी सांगितलं. बिहारमधल्या मतदार याद्या पुनरिक्षणावर चर्चा घेता येणार नाही, असं हरिवंश यांनी स्पष्ट केलं. मात्र विरोधकांच्या घोषणा चालूच राहील्यानं कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित केलं. त्यानंतरही गदारोळ कायम राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं. आता सभागृह येत्या सोमवारी भरेल.

**<><><><>**

पालघर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी विरार-डहाणू आणि चर्चगेट दरम्यान प्रवास करणाऱ्या उपनगरीय रेल्वे प्रवाशांच्या समस्यांचा मुद्दा काल लोकसभेत मांडला. गर्दीच्या वेळी अधिक रेल्वे गाड्या चालवाव्यात, दैनंदिन गरजेनुसार योग्य वेळापत्रक तयार करावं, डब्यांची संख्या १२ वरून १५ करावी, रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूला स्वच्छ स्वच्छतागृहांची सुविधा उभारावी, डिजिटल साइनबोर्ड आणि आसन व्यवस्था करावी अशा विविध मागण्या त्यांनी केल्या. सध्या डहाणूपर्यंत धावणाऱ्या रेल्वे गाडीचा विस्तार उंबरगाव स्थानकापर्यंत वाढवावा अशी मागणीही त्यांनी केली.

**<><><><>**

बँकिंग क्षेत्रात प्रशासकीय सुधारणांसाठी तसंच ठेवीदार आणि गुंतवणूकदारांना अधिकाधिक संरक्षण देण्याच्या उद्देशानं बँकिंग कायदा सुधारणा अधिनियम २०२५ आजपासून लागू झाला. हा कायदा यावर्षी १५ एप्रिलला अधिसूचित करण्यात आला होता.

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं युपीआय पेमेंट ॲपच्या वापरासंबंधी जारी केलेले नवे नियम आजपासून अमलात आले. सर्व्हरवरचा ताण कमी करून ऑनलाइन पेमेंटची कार्यक्षमता वाढण्याच्या उद्देशानं हे नवे नियम लागू केले आहेत.

या नव्या नियमांनुसार आता ग्राहकांना अशा ॲपवरून दिवसभरात आपल्या बँक खात्यातली शिल्लक ५० वेळाच तपासता येईल. यावर आणखी मर्यादा घालण्याचा अधिकार युपीआय पेमेंट ॲप्सला असणार आहे.

याशिवाय आता ऑटो पेमेंटचे व्यवहार आता सकाळी १० वाजण्यापूर्वी, दुपारी १ ते ५ आणि रात्री साडेनऊ नंतर केले जाणार आहेत. याशिवाय जर व्यवहारात अडचण आली तर आता त्या व्यवहाराची प्रत्यक्ष स्थिती ग्राहकांना समजून घेता येणार आहे. स्थिती

तपासण्यासाठी ग्राहकांना ३ संधी मिळतील, त्यासाठी प्रत्येकी ९० सेकंदांचा प्रतीक्षा कालावधी असेल.

<><><><>

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या विसाव्या हप्त्याचं वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या होणार आहे. प्रधानमंत्री उद्या उत्तर प्रदेशात वाराणसीच्या दौऱ्यावर असतील. यावेळी प्रधानमंत्री किसान सन्मान योजने अंतर्गत नऊ कोटी ७० लाख शेतकऱ्यांना २० हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम वितरित केली जाईल.

<><><><>

कोल्हापुरी चपलेच्या जीआय टॅगची अधिकृत नोंदणीकृत मालकी लिडकॉम आणि लिडकर या महामंडळांकडेच असल्याचं दोन्ही महामंडळांनी स्पष्ट केलं आहे.

जूनमधे इटलीच्या प्रसिद्ध 'प्राडा' ब्रँडनं आयोजित केलेल्या फॅशन शोमध्ये मॉडेलनं घातलेल्या लेदर सँडल्सचं डिझाइन जीआय नोंदणीकृत कोल्हापुरी चप्पलसारखं होतं. त्यावर वकिलांच्या एका गटानं प्राडाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली, न्यायालयानं ती फेटाळली. फक्त जीआय टॅगच्या नोंदणीकृत धारक म्हणजेच महाराष्ट्र आणि कर्नाटक चर्मोद्योग विकास महामंडळांनाच अशा प्रकारची दिवाणी कारवाई करण्याचा कायदेशीर अधिकार असल्याचं न्यायालयानं सांगितलं.

या पार्श्वभूमीवर, प्राडा किंवा तत्सम आंतरराष्ट्रीय संस्थांशी कोणत्याही प्रकारचे संवाद, चर्चा किंवा प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार इतर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेला नाही, असं दोन्ही महामंडळांनी स्पष्ट केलं आहे.

<><><><>

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी लोकमान्य टिळकांना आदरांजली वाहिली आहे. लोकमान्यांनी केलेल्या जनजागृतीच्या कार्याचा गौरव त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही लोकमान्य टिळकांना आदराजंली वाहिली आहे.

टिळक पुण्यतिथीनिमित्त आज रत्नागिरीत टिळक आळी इथं त्यांच्या जन्मस्थळी त्यांना अभिवादन करण्यात आलं. जिल्हाधिकारी आणि जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यावेळी उपस्थित होते. लोकमान्यांच्या जन्मघरात त्यांच्या जीवनचरित्रावर आधारित छायाचित्र प्रदर्शन आणि वस्तू असून, मान्यवरांनी त्याची पाहणी केली.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज लोकमान्य टिळक ट्रस्टचा राष्ट्रीय पुरस्कार पुण्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दिला जात आहे. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि इतर मान्यवर उपस्थित आहेत.

<><><><>

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथं अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. अण्णाभाऊ साठे यांनी दाखवलेल्या वंचितांच्या विकासाच्या मार्गावर राज्य शासन चालेल, असं ते यावेळी म्हणाले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मंत्रालयात कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यावेळी अनेक वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देखील अभिवादन केलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन केलं.

<><><><>

व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडरच्या दरात साडे तेहतीस रुपयांची कपात तेल विपणन कंपन्यांनी आज जाहीर केली. त्यानुसार नवी दिल्लीत १९ किलो वजनाच्या सिलेंडरची किंमत १ हजार ६३१ रुपये ५० पैसे असेल. मुंबईत या सिलेंडरची किंमत १ हजार ५८३ रुपये असेल. उपाहार गृह आणि तयार खाद्यपदार्थांच्या दुकानांना याचा फायदा होईल.

घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरच्या किंमतीत कोणताही बदल झालेला नाही.

<><><><>

रक्षाबंधन, गोकुळाष्टमी तसंच वेलंकनी यात्रेसाठी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वे विशेष रेल्वे गाड्या सोडणार आहे.

रक्षाबंधन तसंच, गोकुळाष्टमीसाठी येत्या ७ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट दरम्यान विशेष गाड्या चालवल्या जातील. वांद्रे टर्मिनस ते सांगानेर ही गाडी ७ आणि १४ ऑगस्ट रोजी चालवली जाईल. वांद्रे टर्मिनस ते ओखा या दरम्यान १४ ते १९ ऑगस्ट दरम्यान विशेष गाडी चालवली जाईल.

वेलंकनी यात्रेसाठी २७ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर दरम्यान वांद्रे टर्मिनस ते तमिळनाडूतल्या वेलंकनीपर्यंत विशेष गाड्या चालवल्या जातील.

या सर्व गाड्यांसाठी तिकीट आरक्षण ३ ऑगस्ट रोजी सुरू होईल. प्रवाशांना आयआरसीटीसी च्या अधिकृत संकेतस्थळावर तसंच संगणकीकृत रेल्वे आरक्षण केंद्रांवर तिकीटांचं आरक्षण करता येईल.

**<><><><>**

कोकण रेल्वेवर लांब पल्ल्याच्या सोळा गाड्या रत्नागिरीहून थेट मडगावला थांबतात. त्या गाडयांना सिंधुदुर्ग स्थानकात थांबे द्यावेत, या आणि इतर मागण्यांसाठी कोकण रेल्वे प्रवासी समन्वय आणि सिंधुदुर्ग संघर्ष समितीतर्फे आज सिंधुदुर्ग रेल्वेस्थानकाच्या आवारात आंदोलन करण्यात आलं. तसंच मडुरा - दादर आणि सावंतवाडी-सीएसएमटी गाड्या कायम सुरु कराव्यात, रेल्वेस्थानकांवर स्वच्छता, वीज, एटीएम, पीएसआर सुविधा उपलब्ध करून द्याव्यात या मागण्यांचाही यात प्रामुख्यानं समावेश होता.

**<><><><>**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या यंदाच्या उन्हाळी सत्राअंतर्गतच्या तिसऱ्या टप्प्यातल्या लेखी परीक्षा उद्यापासून सुरु होत आहेत. १८ ऑगस्ट पर्यंत राज्यातल्या एकूण ५३ केंद्रावर ही परीक्षा होईल. ८ हजार चारशेपेक्षा जास्त विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत.

याआधी उन्हाळी सत्राअंतर्गतच्या दुसऱ्या टप्प्यासाठी झालेल्या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासण्याचं काम सुरु असल्याचं विद्यापीठानं कळवलं आहे.

**//<><><><>//**